# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
# राष्ट्रीय क्षयरोग क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम

---

जा.क्र.मनपा/आरोवि/एनटीईपी/ ८४/२०२५-२६ दि-०५-१२-२०२५

## अंतिम मिरिट, निवड व प्रतिक्षा यादी जाहिर सूचना

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम अंतर्गत सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील लॅब टेक्निशियन या पदाची पदभरतीची जाहिरात दिनांक १३.१०.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर पदभरती जाहिरातीस अनुसरुन दिनांक ३१.१०.२०२५ रोजी पर्यंत अर्ज स्विकारण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने लॅब टेक्निशियन पदासाठी प्राप्त अर्जाची छाननी अंती उमेदवारांची जाहिरातीतील संवर्गनिहाय पात्र यादी, अपात्र यादी दिनांक २१.११.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन उमेदवारांकडुन हरकती/तक्रारी दि.२१.११.२०२५ ते २४.११.२०२५ या मुदतीत मागविण्या आल्या होत्या. त्यानुसार विहित मुदतीत एक उमेदवारांकडुन हरकत प्राप्त झाली, त्या उमेदवारांचे सुधारीत पात्र व अपात्र यादी मध्ये समावेश करण्यात आला.

मा.शासनाच्या निकषानुसार गुणांकन पध्दतीच्या आधारे अंतिम मिरिट यादी तयार करण्यात आली असून त्यानुसार अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी यासोबत लगत केली आहे. निवड प्रसिध्द यादीमध्ये निवड झालेल्या लॅब टेक्निशियन उमेदवार यांनी आपली मुळ कागदपत्रे पडताळणीकरीता शहर क्षयरोग कार्यालय, मेन रोड, शाळा क्रमांक १ च्या आवारात स्व.मदनभाऊ पाटील व्यापारी संकुल, दुसरा मजला खोली क्रमांक ८ सांगली ता. मिरज जि.सांगली ४१६४१६ येथे दि.०८/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० ते सायं.५.०० पर्यंत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहण्याचे आहे.

विहित वेळेत उपस्थित न राहणाऱ्या उमेदवारांचे काही म्हणणे नाही असे समजण्यात येवून अशा उमेदवारांना कोणतीही हरकत किंवा तक्रार करता येणार नाही, त्यांना वगळून पुढील भरती प्रक्रिया केली जाईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ.सुचेता पवार)
वैद्यकीय आरोग्याधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सोबतः - जाहिरातीमधील पदानुसार लॅब टेक्निशियन या पदांची अंतिम निवड व प्रतिक्षा यादी